**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ज्येष्ठ नागरीक, अंध व अपंग मतदार तसेच गरोदर अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करु देण्याबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. २०/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ५ डिसेंबर, २०११.**

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्याकरिता तसेच मतदारांना जास्तीत जास्त सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता विविध पावले उचलली आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की वयोवृध्द व्यक्ती, अंध व अपंग मतदार, गरोदर स्त्रिया अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना मतदानाची रांग लांब असल्यास मतदानासाठी त्या रांगेत उभे राहून बराच काळ प्रतिक्षा करावी लागते. यास्तव असे बरेच मतदार मतदानास जाणे टाळतात. पर्यायाने मतदानाची टक्केवारी घटते. अश्या मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे याकरिता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :-

(१) मतदान केंद्राबाहेर वयोवृध्द व्यक्ती, अंध व अपंग मतदार व त्याचा सोबती, गरोदर स्त्रिया अथवा तान्हया मुलासह असणाऱ्या स्त्रिया मतदानाच्या रांगेत उभ्या असतील तर अशा मतदारांना प्राधान्याने मतदान करण्याची संधी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांनी उपलब्ध करुन दयावी. यासंदर्भात तशी स्पष्ट सूचना मतदान केंद्राबाहेर फलकावर लावण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\DISK1_VOL3\D\OLD COMPUTER DATA\CORPORATION\orders.doc